अध्यक्ष महोदय,

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन सभागृहामध्ये सादर करीत आहे.

१. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी कर संकलनाचे सुधारित उद्दिष्ट रुपये दोन लाख अठरा हजार दोनशे त्रेसष्ठ कोटी आहे. यापैकी वस्तू व सेवा कर (जीएसटी), मूल्यवर्धित कर (व्हॅट), केंद्रीय विक्रीकर (सीएसटी), व्यवसाय कर इत्यादी मुख्य करांसाठी कर संकलनाचे सुधारित उद्दिष्ट रुपये एक लाख चौऱ्याऐंशी हजार पाचशे एकोणीस कोटी आहे. देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेवर सद्यस्थितीत आलेली मंदी विचारात घेऊन वरीलप्रमाणे ठरविण्यात आलेले सुधारित उद्दिष्ट साध्य करणे कठीण असले तरी शासन सदरचे उद्दीष्ट साध्य करण्याचा पुरेपुर प्रयत्न करेल.

२. ‘ कोविड-१९ ’ या जागतिक महामारीमुळे राज्याचे मागील एका वर्षात आर्थिक क्षेत्रामध्ये अभुतपूर्व प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्यामुळे, राज्यातील उद्योग, सेवा व इतर क्षेत्रामध्ये मोठी घट झाली आहे.

३. उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेऊन सुद्धा महिलांना केंद्रस्थानी ठेऊन, मी माझ्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या भाग-२ मध्ये खालीलप्रमाणे उपाययोजना सादर करीत आहे.

➢ **कर सवलतीचे प्रस्ताव :—**

- मुद्रांक शुल्कामध्ये सवलत :—

जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने मी केवळ महिला किंवा महिलांच्या नावाने होणाऱ्या घराचे अभिहस्तांतरण किंवा विक्री करारपत्राचे दस्त नोंदणी केल्यास, मुद्रांक शुल्कामध्ये प्रचलित दरातून १ टक्का सवलत देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

यामुळे राज्यास अंदाजे रुपये १००० कोटीच्या महसुली तुटीची शक्यता आहे.

## ➢ कर वाढीचे प्रस्ताव :–

१. राज्य उत्पादन शुल्काच्या दरात वृद्धी :–

देशी मद्याचे ब्रँडेड व नॉन ब्रँडेड असे दोन प्रकार निश्चित करून त्यापैकी देशी ब्रँडेड मद्यावरील उत्पादन शुल्काचा दर, निर्मिती मुल्याच्या २२० टक्के किंवा रुपये १८७ प्रती प्रुफ लिटर यापैकी जे अधिक असेल ते, असा प्रस्तावित करीत आहे.

यामुळे अंदाजे रुपये ८०० कोटी अतिरिक्त महसूल शासनास मिळणे अपेक्षित आहे.

२. मद्यावरील मूल्यवर्धित कराच्या दरात वृद्धी :—

मद्यावर मूल्यवर्धित कर कायद्याच्या अनुसूची ‘ ख ’ नुसार सध्या अस्तित्वात असलेल्या मूल्यवर्धित कराचा दर ६० टक्के वरुन ६५ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच, मूल्यवर्धित कर कायद्यातील कलम ४१ (५) नुसार मद्यावर सध्या अस्तित्वात असलेल्या मूल्यवर्धित कराचा दर ३५ टक्के वरुन ४० टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

यामुळे अंदाजे रुपये १००० कोटी अतिरिक्त महसूल शासनास मिळणे अपेक्षित आहे.

वरील प्रस्तावांना सन्माननीय सभासदांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**